⇒ नाबार्डकडून लेणारा वित्तपुरवठा बंद
⇒ त्यामुळे कर्जव्यवहार बंद

# घटक - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

⇒ RBI - देशाची मध्यवर्ती बँक: सर्वोच्च वित्तिय संस्था:
RBI - मार्फे मौद्रिक व द्रव्यविषयक धोरण राबवले जाते
⇒ १६५६ मध्ये स्थापन झालेली रिक्स बँक ऑफ स्वीडन जगातील पहिली मध्यवर्ती बँक.
१६९४ - बँक ऑफ इंग्लंड.

वैशिष्ट्ये - मध्यवर्ती बँकेची.
1) सर्वोच्च वित्तीय संस्था
2) सरकारच्या मालकीची - राजकीय हस्तक्षेपापासून दूर.
3) हेतू नफा कमावणे नसून अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणे.
4) बँक व्यवस्थेचा विकास.

## RBI ची स्थापना व राष्ट्रीयीकरण:

- शिफारस: ग. ज. वॉरन हेस्टिंग्ज - 'जनरल बँक ऑफ बंगाल अँड बिहार' - स्थापन्याचा सल्ला.
- १९२६: हिल्टन यंग - अध्यक्ष: 'दि रॉयल कमिशन ऑन इंडियन करन्सी अँड फायनान्स' मध्यवर्ती बँक स्थापन्याची शिफारस.
- १९३३ - गोलमेज परिषदांच्या शिफारशीवरून कायदेमंडळात विधेयक
- ६ मार्च १९३४ - ग. ज. ची संमती. - RBI - Act 1934.
- १ एप्रिल १९३५ - RBI ची स्थापना - खाजगी क्षेत्रात.
- आधिकृत भागभांडवल - ५ कोटी: प्रत्येक भाग - १००रु. - १६ सदस्यांचे मंडळ.
- १९४७ पर्यंत ब्रह्मदेशाची व १९४७ ने ३० जून १९४८ पर्यंत पाकिस्तानची मध्यवर्ती बँक म्हणून.
- १९४८ - RBI कायदा 1948 - सार्वजनिक मालकीकडे हस्तांतरण. १ जाने ४९ पासून राष्ट्रीयीकरण
- सरकारने भाग धारकांना प्रत्येक भागासाठी ११८ रु १० आणे दिले व सर्व भाग विकत घेतले.

## RBI चे संघटन व व्यवस्थापन

- स्थापनेच्या वेळी RBI मुख्यालय कलकत्ता: पुढे १९३७ मध्ये मुंबई
- मध्यवर्ती संचालक मंडळ: सध्या मंडळात २० सदस्य - त्यापैकी एक गव्हर्नर चार डेप्युटी गव्हर्नर्स
नेमणूक केंद्रसरकारमार्फत जास्तीत ५ वर्षासाठी - पुनर्नेमणुकीसाठी पात्र
गव्हर्नर ⟹ RBI चा मुख्य कार्य अधिकारी असतो.
इतर सदस्य नेमणूक ⟶ केंद्रसरकार मार्फत ⟶ ४ वर्षासाठी
मध्यवर्ती मंडळाच्या दरवर्षी कमीत कमी ६ सभा होणे आवश्यक.
एन एस विश्वनाथन, BP कानुंगो, विरल आचार्य, महेश कुमार जैन Deputy Governors

- RBI चे पहिले गव्हर्नर : श्री ऑसबॉर्न अर्कल स्मिथ (१९३५-३७)
- पहिले भारतीय गव्हर्नर : श्री सी.डी. देशमुख (१९४३-१९४९) - त्यांनी १९४४ च्या ब्रेटनवूड परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व केले. • त्यांच्याच काळात RBI च्या मालमत्तांचे व देयतांचे विभाजन भारत व पाक मध्ये करण्यात आले (१९४७). त्यांच्याच काळात RBI चे राष्ट्रीयीकरण झाले

सर्वाधिक काळ गव्हर्नर : बेनेगल रामाराव (१९४९ ते १९५७)

सध्याचे गव्हर्नर २४वे : डॉ. उर्जित पटेल (जाने २०१७ मध्ये)

गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नर यांचे निवृत्ती वय ६२ वर्षे तर कर्मचाऱ्यांचे ६० वर्षे.

RBI ची ४ स्थानिक मंडळे : मुंबई, कोलकाता, चेन्नई, नवी दिल्ली.

प्रत्येक स्थानिक मंडळात केंद्र सरकारने ४ वर्षांसाठी नियुक्त केलेल्या ५ सभासद - पुनर्नियुक्तीस पात्र.

मध्यवर्ती कार्यालयाचे काम खालील विभागामार्फत.

① प्रशासन विभाग ② पतनियोजन विभाग ③ विनिमय नियंत्रण विभाग ④ बँकिंग कायदे विभाग ⑤ कृषी पतपुरवठा विभाग ⑥ औद्योगिक पतपुरवठा विभाग ⑦ प्रचलन विभाग -

सध्या RBI ची १९ प्रादेशिक कार्यालये पैकी महाराष्ट्रात ३ ① मुंबई ② बेलापूर ③ नागपूर

जेथे RBI ची कार्यालये नाहीत तेथे SBI - RBI ची प्रतिनिधी म्हणून कार्य करते.

## RBI चे जमाखर्च/ताळेबंदाचे वर्ष -

- - जमाखर्चाचा अहवाल ३० जूनला केंद्र सरकारला - वर्ष - १ जुलै ते ३० जून (१९४० साली जाने-डिसे ऐवजी जुलै-जून असे केले गेले)
- व्यापारी बँकांचे → १ एप्रिल ते ३१ मार्च.

## RBI ची प्रकाशने :

वार्षिक : 1) Annual Report
2) Trends & Progress of Banking in India
3) Report on state finances.

त्रैमासिके : 1) Banking Statistics

मासिके : 1) RBI Bulletin.
2) Credit information Review.

साप्ताहिक : 1) Statistical Supplement.

## RBI ची कार्ये :

फेब्रुवारी २०१५ पर्यंत उद्दिष्ट : 'स्थैर्यासह आर्थिक वाढ'
त्यानंतर - किंमत स्थैर्य.

## RBI ची परंपरागत कार्ये :

① **चलननिर्मिती** : RBI कायदा १९३४ च्या सेक्शन २२ नुसार एक रुपयाचे नाणे व एक रुपयाची नोट व इतर नाणी वगळता सर्व चलन छापण्याचा तसेच प्रसृत करण्याचा अधिकार RBI कडे → RBI च्या प्रचालन विभागाकडे हे काम

Scanned by CamScanner

→ भारतात चलननिर्मितीसाठी १९२५ ते १९५७ पर्यंत प्रमाण निधी पद्धत. त्याअंतर्गत ४०% मात्र सोन्याच्या स्वरूपात - चलनाला आधार

→ १९५७ पासून किमान निधी पद्धत - यामध्ये आधार म्हणून २०० कोटी रु किमान निधी ठेव त्यापैकी ११५ कोटी रुपयांचे सोने (६२.५० रु तोळा) व ८५ कोटी रु चे परकीय सरकारी कर्जरोखे

सरकारची बँक म्हणून : RBI कायद्याने 'केंद्र सरकारची बँक'
राज्यसरकारशी करार करून 'राज्य सरकारची बँक' (सिक्कीम वगळता)

कार्ये ⇒
1) सरकारला बँकविषयक सेवा उपलब्ध करून देणे.
   i) जनतेकडून सरकारची येणी स्विकारणे.
   ii) सरकारला आलेले चेक, ड्राफ्टस् इ. पैसे वसूल करणे.
   iii) सरकारच्या वतीने लोकांची देणी देणे.
2) सरकारी रोखे विकून सरकारला पैसे मिळवून देणे.
3) सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन.
4) सरकारचे परकीय चलनविषयक व्यवहार पाहणे.
5) सरकारच्या वतीने आंतरराष्ट्रीय संस्थांवर प्रतिनिधित्व
6) आर्थिक बाबींवर सल्ला देणे.

) बँकांची बँक म्हणून

① बँकांच्या रोख राखीव निधीचा सांभाळ (CRR)
② कर्जे व अग्रिमे देणे.
③ बँकांना मार्गदर्शन व सल्ला.
④ अंतिम ऋणदाता / अंतिम त्राता - निधी निर्माणाचा रोकड उधारी म्हणतात. संकटग्रस्त बँकांना मदत.
⑤ निरसन गृह / समाशोधन गृह : आंतरबँक व्यवहारांची पूर्तता करणारे केंद्र म्हणजे निरसन गृह. प्रत्येक बँकांची एकमेकांकडे असलेली येणी / देणी यांचा व्यवहार RBI मध्ये पूर्ण होतो

3) पतनियंत्रण : व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीच्या प्रक्रियेवर नियंत्रण

9) परकीय चलन साठ्याचा नियंत्रक :
चलनाचे अंतर्गत तसेच बहिर्गत मूल्य स्थिर राखण्याचे कार्य
परकीय चलनसाठ्याचा सांभाळ

6) पर्यवेक्षणात्मक कार्य :
1) बँकांना परवाना देणे : १९४९ च्या कायद्यानुसार.
तसेच परवाना देण्याचे नाकारण्याचा, परवाना रद्द करण्याचा अधिकार
2) शाखा परवाना पद्धती : बँकांना नवीन शाखा काढण्यासाठी तसेच शाखेची जागा बदलण्यासाठी (गावातच / शहरातच) RBI ची संमती घ्यावी लागते.
अनावश्यक स्पर्धा टाळणे, विशिष्ट भागात शाखा विस्तार थांबवणे.



Scanned by CamScanner

③ बँकांची तपासणी : १९४९च्या कायद्याने सेक्शन ३५नुसार बँकेचा जमाखर्च, लेखे, कागदपत्रे, कार्यपद्धतीचे परिक्षण करण्याचे अधिकार.

④ बँकांच्या कार्यपद्धतीचे नियंत्रण : बँकानी निधीचा अयोग्य व अविचारी वापर करु नये.
① व्यापारी कार्य करण्यास मनाई. ② वापरासाठी आवश्यक स्थावर मालमत्ते-व्यतिरिक्त इतर स्थावर मालमत्ता धारण केल्यास ७ वर्षाच्या आत विल्हेवाट लावणे आवश्यक.

⑤ बँकेच्या व्यवस्थापनावरील नियंत्रण : संचालक मंडळाच्या रचनेवर नियंत्रण. खाजगी बँकेच्या अध्यक्ष तसेच CEO ची नेमणूक, पुनर्नेमणूक, सेवामुक्तीसाठी RBI ची संमती. संचालक संख्या, पगार, सेवाशर्ती इ. मध्ये बदल करण्यासाठी —॥—.

⑥ बँकांचे विलीनीकरण व पुनर्रचना : बँकांच्या ऐच्छिक विलीनीकरणासाठी RBI ची संमती आवश्यक.
- आजारी किंवा अक्षम बँकांचे सक्तीने विलीनीकरण करण्याचा अधिकार.
- १९९३ - न्यू बँक ऑफ इंडियाचे - PNB मध्ये विलीनीकरण.
- २० जुलै १९९४ - बँक ऑफ कराड - BOI मध्ये.
- २६ जुलै २००४ - ग्लोबल ट्रस्ट बँक - ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स मध्ये.

⑦ वित्तिय पर्यवेक्षण मंडळ तसेच पर्यवेक्षण विभागाची स्थापना.
- १९९४ मध्ये वित्तिय पर्यवेक्षण मंडळाची (Board of financial Supervision)
- डिसे १९९३ मध्यवर्ती कार्यालयात स्वतंत्र पर्यवेक्षण विभागाची स्थापना.

क) <u>प्रवर्तनात्मक कार्ये</u> : महत्वाच्या आर्थिक क्षेत्राकडे कर्जाचा प्रवाह वळविण्याचे कार्य.

① व्यापारी बँक व्यवसायाचे प्रवर्तन : बँक व्यवसायाचा विस्तार करणे, सक्षमता साधणे त्यासाठी बँकांचे नियंत्रण, विलिनीकरण, बँकींगच्या नवीन पध्दती, ठेवी विमा इ.

② सहकारी बँक व्यवसायाचे प्रवर्तन : सह. बँकांना प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष वित्तपुरवठा.

③ कृषी व ग्रामीण पतपुरवठ्याचे प्रवर्तन › त्यासाठी i) स्वतंत्र कृषी विभागाची स्थापना.
ii) 1963 - कृषी पुनर्वित्त महामंडळाची स्थापना (१९७५ - कृषी पुनर्वित्त व विकास महामंडळ)
iii) प्रादेशिक ग्रामीण बँकाच्या स्थापनेत पुढाकार.
iv) नाबार्डची स्थापना.

④ औद्योगिक वित्तपुरवठ्याचे प्रवर्तन : उद्योग क्षेत्रास दिर्घमुदतीचा पतपुरवठा.
IFCI, IDBI, SFCs, SIDCs, SIDBI इ.

⑤ निर्यात वित्त पुरवठ्याचे प्रवर्तन : निर्यात वृध्दीसाठी बँकांना पुनर्वित्त पुरवठा.
1982 - Exim बँकेची स्थापना. ती परकीय व्यापारास वित्तपुरवठा करणारी शिखर बँक

Scanned by CamScanner

# * RBI चे मौद्रिक धोरण *

## (Monetary Policy of the RBI)

* मौद्रिक धोरणालाच द्रव्य निती, चलनविषयक धोरण, पैशाचे धोरण.

अर्थ ⇒ राष्ट्रीय उत्पन्न व रोजगाराची पर्याप्त पातळी गाठणे, किंमत स्थैर्य राखणे, व्यवहारतोल स्थैर्य राखणे इ. बाबी साध्य करून देशाच्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त व्हावे व आर्थिक विकासाला गतिशील ठेवावे या हेतूंनी देशांतर्गत कागदी चलन व पतचलन यांचा पुरवठा व वापरावर कार्यक्षम नियंत्रण ठेवण्यासाठी अनुसरण्यात येणारे धोरण म्हणजे मौद्रिक धोरण होय.
या धोरणाचा परिणाम पतनिर्मिती, पतपुरवठा, कर्जाची उपलब्धतता, व व्याजदर सर्वांवर होतो.
त्या सर्वांचा प्रभाव गुंतवणूक, उत्पादन, वाणिज्य, रोजगार यावर होतो.

मौद्रिक धोरणाची उद्दिष्टये.

i) चलनपुरवठ्याचे नियमन व नियंत्रण.
ii) व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण
iii) तेजी व मंदीच्या चक्राचे दुष्परिणाम टाळणे.
iv) देशांतर्गत किंमत पातळी स्थैर्य राखणे.
v) विदेशी विनिमय दरामध्ये स्थैर्य निर्माण करणे.
vi) रोजगार वाढीसाठी प्रयत्नशील राहणे.
vii) आर्थिक स्थैर्य.

RBI दरवर्षी आपले वार्षिक मौद्रिक धोरण एप्रिलमध्ये जाहीर करते.
एप्रिल २०१४ पासून द्वैमासिक धोरण चक्र स्विकारले.

पतचलन नियंत्रणाचा अर्थ :

⇒ पतनियंत्रण धोरणाचा अवलंब करून अर्थव्यवस्थेत आवश्यकतेपेक्षा जास्त पतचलननिर्मिती झाली असेल तर महाग पैशाच्या धोरणाचा अवलंब करून पतचलन संकोच घडवून आणते. याउलट कमी पतचलन निर्मिती होत असेल तर स्वस्त पैशाच्या धोरणाचा अवलंब करून पतचलन विस्तार घडवून आणते. असे पतचलन घडवून आणण्यासाठी RBI ज्या साधनांचा वापर करते त्यांना पतचलन नियंत्रणाची साधने असे म्हणतात.

पतनियंत्रणाची साधने ⇒ ① संख्यात्मक ② गुणात्मक

(A) संख्यात्मक साधने :

संख्यात्मक साधनांचा परिणाम प्रत्यक्ष पतचलनाच्या संख्येवर किंवा प्रमाणावर किंवा आकारमानावर होत असतो. त्यामध्ये.

1) बँक दर : बँक दर म्हणजे असा प्रमाण दर की ज्या दराने RBI व्यापारी बँकांना अल्पमुदतीचा कर्ज पुरवठा करतात.
RBI ने हा दर वाढविल्यास बँकासुद्धा आपला व्याज दर वाढवितात त्यामुळे

कर्जे महाग होतात. त्यामुळे लोकांची कर्ज घेण्याची प्रवृत्ती कमी होते. ते कमी कर्जे घेतात त्यामुळे गुंतवणूक कमी होते परिणामी आर्थिक व्यवहार कमी होतात. अर्थव्यवस्थेतील पैसा कमी होतो. किंमती घटू लागतात. रोजगार कमी होतो, पतचलन संकोच घडून येतो. बँक दर वाढविण्याच्या या धोरणाला 'महाग पैशाचे धोरण' म्हणतात. तेजीच्या परिस्थितीमध्ये किंवा किंमत वाढीच्या काळात हे धोरण राबवले जाते.

बँक दर कमी केल्यास व्यापारी बँका सुद्धा व्याजदर कमी करतात. कर्जे स्वस्त होतात. आर्थिक व्यवहार, रोजगार, किंमती यात वाढ होते. पैशाला मागणी येवून पतचलन विस्तार होतो. या धोरणाला 'स्वस्त पैशाचे धोरण' म्हणतात मंदीच्या परिस्थितीत हे धोरण राबवले जाते. (चलन घटीच्या/ किंमत घटीच्या काळात)

) राखीव निधीचे बदलते प्रमाण:

अ) रोख राखीव प्रमाण: ( Cash Reserve Ratio - CRR)

प्रत्येक व्यापारी बँकेला स्वतः जवळ जमा झालेल्या एकूण ठेवींपैकी ( बिनबळ मागणी व मुदत ठेवींपैकी) काही प्रमाणात ठेवी RBI कडे रोख पैशाच्या प्रमाणात ठेवाव्या लागतात त्याला CRR म्हणतात. - हे बंधन 1934 नुसार.

बिगर अनुसुचित बँका - CRR स्वतः कडेच ठेवू शकतात - Act -1934 section 18

⇒ CRR - वाढविल्यास बँकांची पतनिर्मिती क्षमता कमी होते. पतसंकोच घडून येवू शकतो.

⇒ CRR - कमी केल्यास - पतनिर्मिती क्षमता वाढते. पतविस्तार घडून येतो.

ब) वैधानिक रोखता प्रमाण ( Statutory Liquidity Ratio) SLR.

प्रत्येक व्यापारी बँकेला स्वतः जवळ जमा झालेल्या एकूण ठेवींपैकी (बिनबळ मागणी व मुदत ठेवींपैकी) काही प्रमाणात ठेवी स्वतः कडे रोख स्वरूपात /सोन्याच्या स्वरूपात/ सरकारी रोख्यांच्या स्वरूपात ठेवाव्या लागतात. त्याला SLR म्हणतात.

SLR चे बंधन बँकिंग नियमन कायदा 1949 सेक्शन 24 नुसार.

<u>SLR ची आवश्यकता</u>

SLR च्या ठेवी कर्जे देण्यासाठी वापरता येत नाही. बँकांनी सर्व ठेवी कर्जरूपाने वाटून टाकल्यास ठेवीदारांच्या ठेवींच्या मागणीचे समाधान करता येणार नाही. बँकांची पत धोक्यात येवून बँक बुडण्याची शक्यता. म्हणून SLR चे बंधन

शक्यतो सरकारी रोख्यामध्ये गुंतवतात - कारण रोख्यांची रोखता, लाभता, सुरक्षितता उच्च असते.

पतनियंत्रणाचे साधन म्हणून वापर:

SLR वाढविल्यास पतसंकोच तर कमी केल्यास पतविस्तार घडून येतो.

Scanned by CamScanner

३) रेपो आणि रिव्हर्स रेपो व्यवहार :

अर्थ ⇒ रेपो (Repo - Repurchase Obligation) - पुनर्खरेदी बंधन.

वस्तूची आज विक्री केल्यास ठराविक कालावधीनंतर आधीच ठरलेल्या दराने त्या वस्तूची पुनर्खरेदी केली जाते. पुनर्खरेदीच्या दराला रेपो दर म्हणतात.
रेपो व्यवहार कोणत्याही वस्तूंचा केला जावू शकतो.

( १९९१-९२ पासून ओव्हरनाईट रेपो व रिव्हर्स रेपो व्यवहाराची सुरुवात
ऑक्टो २०१३ पासून टर्म रेपो व रिव्हर्स रेपो — ॥ — )

⇒ RBI चे ओव्हरनाईट रेपो व्यवहार :

RBI व्यापारी बँकाकडून सरकारी रोखे खरेदी करून त्यांना कर्ज देते. ही कर्जे एक दिवसांची (overnight) वर विकेंडसाठी (३ दिवसांची - टर्म) असतात.
दुसऱ्या दिवशी बँका पुन्हा कर्जे परत करतात व रोख्यांची पुनर्खरेदी करतात. या व्यवहाराला रेपो व्यवहार, कर्जदराला रेपो दर म्हणतात.

रेपो व्यवहारामुळे बँकांच्या हातातील अल्पकालीन रोखता वाढते.

i) चलनवाढीच्या परिस्थितीत RBI - Repo दर वाढवते - कर्जे महाग बनवते.
अल्पकालीन रोखता कमी करणे हा उद्देश — कर्जे देण्याची क्षमता कमी होते.

२) चलनघटीच्या परिस्थितीत RBI - Repo दर घटविते - कर्जे स्वस्त बनविते.
अल्पकालीन रोखता वाढते - कर्जे देण्याची क्षमता वाढते.

⇒ RBI चे ओव्हरनाईट रिव्हर्स रेपो व्यवहार :

यामध्ये व्यापारी बँका RBI कडून सरकारी रोखे खरेदी करून RBI ला कर्ज देता ही सुद्धा एका दिवसांची कर्जे असतात (Weekend साठी ३ दिवसांची) दुसऱ्या दिवशी RBI रोख्यांची पुनर्खरेदी करते. या व्यवहाराला रिव्हर्स रेपो म्हणतात. व कर्जदराला रिव्हर्स रेपो दर म्हणतात.

→ बँकांच्या हातातील अल्पकालीन रोखता कमी होते.

i) चलनवाढीच्या परिस्थितीमध्ये RBI रिव्हर्स रेपो दर वाढविते.
बँकांची ग्राहकांना कर्ज देण्याची क्षमता घटते.

ii) चलनघटीच्या परिस्थितीमध्ये RBI रिव्हर्स रेपो दर कमी करते
बँकांनी RBI ला कमी कर्ज द्यावी परिणामी बँकेची अल्पकालीन रोखता वाढावी
ग्राहकांना कर्ज देण्याची क्षमता वाढते.

⇒ RBI चे टर्म रेपो व रिव्हर्स रेपो :

ऑक्टो २०१३ पासून - टर्म रेपो व्यवहार - कालावधी ७/१४/२८/५६ दिवस.

Scanned by CamScanner

४) RBI ची 'मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी' (Marginal Standing Facility) MSF

→ RBI ने 3 मे 2011 रोजी जाहीर केलेल्या मौद्रिक धोरणात 'मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी'ची घोषणा केली.

→ या सुविधेअंतर्गत ज्या व्यापारी बँकांना अचानक रोखतेची तीव्र गरज निर्माण होते त्या बँका निव्वळ देयतांच्या 2% पर्यंत रक्कम कर्ज म्हणून 24 तासासाठी RBI कडून घेवू शकतात. या कर्जावरील व्याज दर रेपो दरापेक्षा अधिक असतो. या कर्जासाठी बँका SLR च्या तारण म्हणून वापर करतात.

| | CRR | SLR | Repo | R.Repo | MSF | Bank Rate |
|---|---|---|---|---|---|---|
| Aug 2018 | 4% | 19.5% | 6.50% | 6.25% | 6.75% | 6.75% |
| June 18 | | | 6.25 | 6.00 | | |

2011 पासून केवळ Repo दर जाहीर केला जातो.
जाने 2014 नुसार R.Repo – Repo दरापेक्षा -0.25 ने कमी तर MSF 0.25 ने जास्त.
बँक दर व MSF हे सारखेच असतात.

३) खुल्या बाजारातील रोख्यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार :

अर्थ → व्यापक अर्थाने – मध्यवर्ती बँकेने सरकारी रोखे, व्यापारी हुंड्या, परकीय चलन, सोने इ. ची केलेली खरेदी विक्री.

वैधानिक आधार → RBI कायदा 1934 – सेक्शन 17 नुसार

या कलमानुसार RBI केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांच्या कोणत्याही मुदतीच्या सरकारी रोख्यांची तसेच मध्य संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या रोख्यांची खरेदी विक्री खुल्या बाजारात करू शकते. मात्र सध्या फक्त केंद्र सरकारच्या रोख्यांची विक्री करते. कालावधीचे बंधन नाही. अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या

⇒ रोख्यांची विक्री करून सरकारची कर्ज उभारणी करणे.

⇒ बँकाजवळील रोख पैशाच्या साठ्यात बदल घडवून पतनियंत्रण करणे.

i) रोखे विक्रीसाठी काढल्यानंतर बँक, ग्राहक, बँकेतर संस्था इ. ते रोखे विकत घेतात. लोकांनी व बँकेतर संस्थानी रोखे विकत घेतले तर ते बँकेतून पैसा काढून रोखे खरेदी करतात. तर बँकांनी खरेदी केले तर तो पैसा RBI कडे जमा होतो. त्यामुळे बँकेकडील पैसा कमी होतो. त्यामुळे पतसंकोच घडून येतो. तेजीच्या काळात RBI रोख्यांची विक्री करते.

Scanned by CamScanner

ii) याउलट खुल्या बाजारात RBI ने रोखे खरेदी केल्यास ग्राहक, बँका व संस्था असे रोखे RBI ला विकतात त्यांना धनादेशाद्वारे रक्कम प्राप्त होते. धनादेश बँकेत जमा होतात. बँकातील ठेवी वाढतात. पतविस्तार घडून येते - मंदीच्या काळात RBI खरेदी करते.

६) **बाजार स्थैर्य योजना** (Market Stabilisation Scheme-MSS)

2004 पासून RBI चे नवीन साधन

व्यापारी बँकाकडे मोठ्या भांडवली प्रवाहातून जमा झालेली टिकाऊ स्वरूपाची अतिरिक्त रोखता शोषून घेण्यासाठी - RBI अल्पकालीन सरकारी रोखे व ट्रेझरी बिलांची विक्री करते. जमा झालेली रक्कम RBI सरकारी खात्यात ठेवते.

## * सरकारी रोखे *

केंद्र व राज्य सरकारची व्यापारक्षम साधने.

सरकारची कर्जदायित्व प्रदर्शित करतात.

प्रकार दोन: अल्पकालीन (1 वर्षापेक्षा कमी मुदत) - त्यांना कोषागार हुंड्या (ट्रेझरी बिले)

दीर्घकालीन (1 —॥— जास्त मुदत) - कालिक रोखे (सरकारी बाँड्स)

केंद्र सरकार दोन्ही प्रसृत करते.

राज्य सरकार मात्र केवळ सरकारी बॉन्ड्स प्रसृत करतात.

ट्रेझरी बिले - ९१/१८२/३६४ दिवसांच्या कालावधीची - हे Zero Coupan रोखे आहेत. त्यांच्यावर व्याज मिळत नाही. मात्र ती कसरीवर वटवली जातात. (Descounting)

RBI दर बुधवारी ट्रेझरी बिलांचा लिलाव घडवून आणते.

## * पतनियंत्रणाची गुणात्मक साधने *

बँकिंग नियमन कायदा 1949 नुसार:-

गुणात्मक साधने पतपैशाच्या वापरावर किंवा उपभोगावर नियंत्रण करतात.

① तारणमूल्य व कर्ज रक्कम यातील गाळा ठरविणे:

⇒ तारणाचे बाजारमूल्य व कर्जाची रक्कम यातील टक्केवारीतील फरक म्हणजे तारणपत्राची मर्यादा किंवा गाळा होय.

⇒ RBI च्या निर्देशानुसार उत्पादक कर्जासाठी गाळा कमी तर साठेबाजी, सट्टेबाजी, चैनीच्या वस्तूंचे उत्पादन इ. अनुत्पादक कार्यासाठी गाळा अधिक असतो.

② उपभोग्य कर्जाचे नियंत्रण:

ग्राहक आपल्या गरजा भागविण्यासाठी टिकाऊ उपभोग्य वस्तूंच्या (उदा. टी.व्ही. फ्रिज इ.) खरेदीसाठी बँकाकडून उपभोग कर्जे घेतात - RBI मार्फत यावर नियंत्रण केले जाते.

तेजीच्या — परिस्थितीत — वस्तूंची मागणी कमी करून किंमती नियंत्रित करण्यासाठी RBI

Scanned by CamScanner

बँकाना उपभोग्य कर्ज न देण्याची सूचना देते. किंवा अटी कडक करण्याच्या सूचना देते.
→ याउलट मंदीच्या परिस्थितीत वस्तूंची मागणी वाढवायची असल्यास कर्जविषयक अटी सुलभ करण्याचा सल्ला देते.

3) कर्जाचे रेशनिंग: (Rationing of Credit)

या साधनाद्वारे बँकांना मिळणाऱ्या कर्ज मर्यादा निश्चित केल्या जातात.
वेगवेगळ्या प्रकारच्या कर्जासाठी वेगवेगळे पात्रता नियम.
कृषी, लघुउद्योग, निर्यात क्षेत्र – यांना कमी दराने कर्ज
अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठा हा कर्जाच्या रेशनिंगचाच एक प्रकार.

3) नैतिक समजावणी:

RBI- बँकांची मित्र, सल्लागार, व मार्गदर्शक अशी भूमिका.
त्यासाठी बँकांशी चर्चा, पत्रव्यवहार इ. चा अवलंब.

) प्रसिद्धी

विविध प्रकारची माहिती (उदा. सांख्यिकीय, धोरणात्मक, किंमतविषयक, परकीय चलनदर विषयक, कर्ज, व्यापार, उद्योग) गोळा करून प्रसिद्ध करण्याचे कार्य करते. त्या माहितीवरून बँका आपली धोरणे आखतात.

) आदेशाद्वारे नियंत्रण:

बँकिंग नियमन कायदा १९४९ नुसार RBI बँकांना आदेश देवू शकते व ते बँकाना पाळावेच लागतात. (उदा. कर्ज, व्याजदर, शाखा विस्तार संबंधी)
१९६५ च्या क्रेडिट ऑथोरायजेशन स्किम अंतर्गत बँकांच्या पतपुरवठ्याचे आकारमान अटी इ. वर नियंत्रण प्राप्त केले.
१९८८ मध्ये ही स्किम रद्द करून Credit Monitoring Arrangement ची निर्मिती.

) प्रत्यक्ष कारवाई

बँकांनी सूचना/आदेश न पाळल्यास हुंड्यांचे पुनर्वटन नाकारून कर्ज देण्यास नकार, दंडात्मक व्याजदर, शाखा काढण्यास परवाना नाकारणे, नाणे बाजारात हिस्सा घेण्यास नकार, बँकेचा परवाना रद्द करणे.

## * डॉ ऊर्जित पटेल समिती *

RBI ने डेप्युटी गव्हर्नर डॉ ऊर्जित पटेल यांच्या अध्यक्षतेखाली १२ सप्टें २०१३ रोजी मौद्रिक धोरण आराखडा बळकट करण्यासाठी- समिती – अहवाल जाने. २०१४

शिफारशी:
i) मौद्रिक धोरण आराखड्यासाठी 'ग्राहक किंमत निर्देशांक' (CPI- Consumer Price Index) ऐवजी multiple indicator approach चा वापर RBI करते.
ii) चलनवाढीच्या दराचे लक्ष्य ४% असावे (+/- २%)
iii) CPI वाढीचा दर २०१५ पर्यंत ८% व जाने २०१६ पर्यंत ६% कमी – लक्ष्य

Scanned by CamScanner

त्यानंतर ४% चे लक्ष्य:

iv) मौद्रिक धोरणाचे निर्णय RBI चे गव्हर्नर यांनी न घेता त्यासाठी 'मौद्रिक धोरण समिती' स्थापन करण्यात यावी. अध्यक्ष - गव्हर्नर

## मौद्रिक धोरण समिती :- (Monetary Policy Committee.)

MPC ची स्थापना: वैधानिक आधार देण्यासाठी RBI ॲक्ट 1934 मध्ये बदल.
कायद्यात Section 45 ZB या नवीन कलमाचा समावेश.
२७ जून २०१६ बदल अधिसूचित.

रचना: ६ सदस्यीय समिती.
अध्यक्ष ⇒ गव्हर्नर
३ सदस्य ⇒ RBI चे ⇒ Deputy Governor - मौद्रिक धोरणाचे इनचार्ज, संचालक मंडळाद्वारे
३ सदस्य ⇒ भारत सरकार मार्फत -- सदस्य अर्थशास्त्र, बँकिंग, वित्त, मौद्रिक धोरण इ क्षेत्रातील तज्ञ. नियुक्त ४ वर्षांसाठी - पुनर्नेमणुकीसाठी अपात्र

### MPC चे कार्य:

1) व्याजाचे दर ठरविणे हे प्राथ. कार्य.
2) प्रत्येक वर्षी ४ वेळा सभा - गणसंख्या ४ सदस्य - प्रत्येक सदस्य - १ मत
3) सभेचे निर्णय प्रासंगिक केले जातील.
4) समान मते झाल्यास गव्हर्नर निर्णायक मत.
5) सलग ३ तिमाहींमध्ये चलनवाढीचा दर २% पेक्षा कमी किंवा ६% पेक्षा जास्त ठरल्यास MPC लक्ष्यपूर्तीमध्ये अपयशी ठरल्याचे मानता येईल.

Scanned by CamScanner